# <u>वृत्तपत्र सुचना</u>

ग.द.आंबेकर मार्ग, सरफरे चौक ते अलबेला हनुमान चौकापर्यंत करण्यात येणाऱ्या मोनोरेल बांधकामादरम्यान वाहन चालक व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून नमुद ठिकाणावरील मोनोरेलचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे वाहतुकीवर २४ तास निर्बंध घालण्यात येत आहेत.

1. ग.द.आंबेकर मार्ग, सरफरे चौक ते अलबेला हनुमान चौकापर्यंत दोन्हीही बाजूंचा मार्ग सर्व प्रकारच्या वाहतुकीकरीता २४ तास बंद (No Entry) राहील.

2. ग.द.आंबेकर मार्ग, सरफरे चौक ते अलबेला हनुमान चौकापर्यंत सर्व प्रकारची वाहतुक ही सरफरे चौक येथून नायगाव क्रॉस रोड, गणेश मंदिर मार्ग जंक्शन—डावे वळण—गणेश मंदिर मार्ग—गणेश मंदिर मार्ग, टिळक रोड जंक्शन—डावे वळण—टिळक रोड—अलबेला हनुमान चौक या मार्गाने वळविण्यात येणार आहे.

3. गणेश मंदिर मार्गाचे पूर्व बाजूस नायगाव क्रॉस रोडपासून ते टिळक रोडपर्यंत सर्व प्रकारची वाहने उभी करण्यास प्रतिबंध (No Parking) राहील.

वाहन चालकांच्या मार्गदर्शनासाठी वाहतुक पोलीसांकडून वर नमुद ठिकाणी मार्गदर्शक फलक लावण्यात येतील. तसेच जनतेला मदत करण्यासाठी वाहतुक पोलीसांची नेमणूक करण्यात येणार आहे. जेणेकरून वाहन चालकांना कमीत कमी गैरसोय होईल व रहदारी सुरळीत चालू राहील.

सही/—

**( नंदकुमार चौगुले )**
पोलीस उप आयुक्त
(दक्षिण),
वाहतुक, मुंबई.
<u>जा.क्र. ७९४/वा/शि/१०</u>
०८/११/२०१०